स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेतंर्गत मराठी विषयातील पीएच.डी.
(विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर केल्या जाणाऱ्या
शोध - प्रबंधाची स्थूल रूपरेषा

"२१ व्या शतकातील मराठी भाषेचा चिकित्सक अभ्यास"

~: संशोधक :~

प्रा. राजकुमार शंकर पवार

एम.ए., बी.एड. (मराठी)

श्री. कुमारस्वामी महाविद्यालय, औसा, जि. लातूर

~: मार्गदर्शक :~

प्रा. डॉ. सौ. जयदेवी पवार

एम.ए., बी.एड., एम.फिल., पीएच.डी.

मराठी विभाग

कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव, जि. लातूर

~: संशोधन केंद्र :~

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

~: वर्ष :~

मार्च २०१६

"२१ व्या शतकातील मराठी भाषेचा चिकित्सक अभ्यास"

प्रास्ताविक :-

जन्म, जन्मभूमी आणि मातृभाषा ही महाराष्ट्रातील लोकजीवनाचा अविभाज्य भाग आहे. मराठी भाषा ही अविवेकाचा अंध:कार आणि अज्ञानाची काजळी दूर करुन मराठी भाषिकांना अखंड ज्ञानाची दीपज्योत देणारी प्रकाशमय धारा आहे. अशा या मराठी भाषेच्या उगम आणि व्युत्पत्ती संदर्भात शिलालेख, ताम्रपटात अनेक संदर्भ आलेले दिसतात. यामध्ये पाटण, परळ, सावरगाव, पळसदेव, श्रवणबेळगोळ, पंढरपूरचा शिलालेख आणि दिवेआगरचा ताम्रपट, सोमेश्वरांचा मानसोल्लास, लल्लच्या रत्नकोशात, श्रीपती यांच्या ज्योतिषरत्नमालेत मराठीचे उल्लेख आहेत. याशिवाय राजकीय स्थित्यंतरांमुळे मराठी भाषेवर अनेक आक्रमणे झाली ; साधारणत: आठव्या, नवव्या शतकापासून म्हणजे संत ज्ञानदेव, नामदेवाच्या अगोदर कित्येक शतके मराठी भाषेचा हळूहळू विकास होत चालला होता. खऱ्या अर्थाने मराठी भाषा ग्रांथिक भाषेत विराजमान झाली ती यादवकाळातच, म्हणूनच यादवकाळ हा मराठी भाषेच्या व साहित्यनिर्मितीच्या दृष्टीने सुवर्णकाळच म्हणावे लागेल.

वारकरी, महानुभव, नाथ आणि समर्थ या चारही संप्रदायाने मराठी भाषेला समृद्ध केले आहे. संत ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी', श्रीचक्रधरस्वामी यांचा 'लीळाचरित्र' हे ग्रंथ मराठी भाषेचे उत्तम उदाहरण म्हणून सांगता येते. याशिवाय मराठी भाषेच्या विकासाचा विचार करता ब्रिटिशपूर्व काळात मराठीचा म्हणावा तितका विकास झाल्याचे दिसून येत नाही. परंतु ब्रिटिश सरकारने भारतात केलेल्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक सुधारणांचा प्रभाव मराठी भाषावर पडला व यातूनच अनेक लेखकांनी निबंध, विविध ग्रंथ, कोश, व्याकरण आणि अनेक मराठी नियतकालीकांतून मराठी भाषेत लेखन केले गेले आहे. १९ व्या व २० व्या शतकात मराठी भाषा विविध लेखकांच्या लेखनीने विकसित होत गेली. आज २१ व्या शतकात जागतिकीकरण, आधुनिकीकरण आणि इतर भाषांच्या आक्रमणामुळे मराठी भाषेचे महत्त्व कमी झाल्याचे अनेक मराठी अभ्यासकांचे मत आहे. परंतु असे असले तरी मराठी भाषेच्या वैभवसंपन्न समृद्धतेमुळे मराठी भाषा ही कालही टिकून होती, आजही आहे आणि उद्याही टिकून राहील असे संशोधकास वाटते.

विषय निवडीची भूमिका :-

मराठी ही मातृभाषा, हिंदी ही राष्ट्रभाषा आणि इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा असे म्हटले जाते. त्यामुळे या तिन्ही भाषेला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे दिसते. परंतु मराठी ही महाराष्ट्रीयन लोकांच्या संवादाचे, संस्कृतीचे, अस्मितेचे देखणे वैभव आहे. म्हणजेच मराठी भाषा ही केवळ आपली राजभाषा नाही, तर आपले सांस्कृतिक वैभव आणि महाराष्ट्रीय माणसांचा मानबिंदू आहे. मराठी भाषेच्या विकासातच या राज्याचा सर्वांगीन विकास सामावलेला आहे, त्यामुळे मराठी भाषेचा विकास ही आपल्या सर्वांची जबाबदारी आणि सर्वाधिक प्राधान्याने करण्याची गोष्ट आहे. म्हणूनच मराठी भाषेचा वसा आणि वारसा भविष्यात कसा टिकवून ठेवता येईल या दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी "२१ व्या शतकातील मराठी भाषेचा चिकित्सक अभ्यास" हा विषय संशोधकाने निवडला.

महाराष्ट्राची मातृभाषा मराठी असली तरी आज २१ व्या शतकात इंग्रजी भाषेचा वाढता झंझावात, मराठी माणसांची मराठी भाषेविषयी असलेली उदासीनता, वाचनसंस्कृतीविषयी असलेली अनास्था, परकीय भाषांचे आक्रमण, जागतिकीकरण, प्रसारमाध्यमांचे वाढते प्रस्थ अशा विविधांगी कारणांमुळे मराठी भाषेचे महत्त्व कमी झाले आहे. त्यामुळे २१ व्या शतकात मराठी भाषा टिकवून ठेवण्यासाठी शासन, प्रसारमाध्यमे, मराठी प्राध्यापक, मराठी साहित्य परिषद, वाङ्मय संस्था, मराठी विद्यापीठ, मराठी साहित्यिक आणि वाचक अशा सर्वांनी मराठी भाषेच्या संवर्धन व विकासासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात किंवा त्यांची भूमिका कोणती राहिली पाहिजे या दृष्टिकोनातून मराठी भाषेचा शोध आणि बोध घेण्यासाठी प्रस्तुत विषय अभ्यासकांने संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधक हा मराठी या विषयाचा प्राध्यापक, अभ्यासक असल्यामुळे मराठी भाषा आणि मराठी भाषेतील साहित्याविषयी अस्मिता बाळगणारा, विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अभिरूची निर्माण करणारा आहे. त्यामुळे सर्वच शिक्षक, प्राध्यापकांनी प्राथमिक, माध्यमिक, उच्च - माध्यमिक, महाविद्यालय, विद्यापीठ अशा सर्वच स्तरात मराठी भाषेची ज्ञानगंगा मराठी अभ्यासकांना ज्ञानरूपी तेजाने देण्याचा प्रयत्न करावा आणि संशोधनाच्या माध्यमातून त्यांच्यात प्रेरणा निर्माण करावी या दृष्टिकोनातून प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडला.

२१ व्या शतकात आज इंग्रजी, हिंदी अशा विविध भाषेचे वाढते महत्त्व आणि जागतिकीकरणाच्या सपाट्यात मराठी माणूस इतर भाषेचा गुलाम झाल्याचे दिसून येते. परंतु कवी कुसुमाग्रज म्हणतात की,

"परभाषेतहि व्हा पारंगत ज्ञानसाधना करी, तरी |

माय मराठी मरते इकडे परकीचे पद चेपु नका ||

भाषा मरता देशहि मरतो संस्कृतिचाही दिवा विझे |

गुलाम भाषिक होऊनि आपुल्या प्रगतिचे शिर कापु नका ||"

म्हणजेच मराठी भाषेची अस्मिता महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण जगात कशी रूजेल या दृष्टिकोनातून संशोधन करण्यासाठी आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा संशोधनाच्या माध्यमातून मिळवून देण्यासाठी हा विषय संशोधकाने संशोधनासाठी हाती घेतला.

संशोधनाची उद्दिष्टये :-

१. मराठी भाषेच्या उगम आणि विकासाचा वेध घेणे.

२. मराठी भाषेवर २१ व्या शतकात इतर भाषेचा पडलेला प्रभाव व परिणामाची मीमांसा करणे.

३. मराठी भाषेसमोरील आव्हाने आणि उपाययोजनांचा शोध घेणे.

४. जागतिकीकरण, आधुनिकीकरण व संगणकीकरणांचा मराठी भाषेवर पडलेला प्रभाव यांचे मर्म उकलणे.

५. मराठी भाषा आणि मराठी भाषेतील साहित्याचा शोध घेणे.

६. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा कसा मिळेल याचा वेध घेणे.

७. मराठी भाषेच्या सद्य:स्थितीचा शोध घेणे.

संशोधन पद्धती :-

"२१ व्या शतकातील मराठी भाषेचा चिकित्सक अभ्यास" या विषयाचे संशोधन करीत असताना ग्रंथालयीन, विश्लेषणात्मक, सर्वेक्षणात्मक आणि ऐतिहासिक अशा संशोधन पद्धतीच्या आधारे मराठी भाषेचा अभ्यास व संशोधन केले जाईल.

संशोधन विषयाची सामुग्री :-

प्रस्तुत विषयाचे संशोधन करीत असताना मराठी भाषेवर प्रकाशित झालेले विविध समीक्षाग्रंथ, वैचारिक लेखन, मासिक, त्रैमासिक, नियतकालीक, दिवाळीअंक, साप्ताहिक, वर्तमानपत्रे, विविध मराठी अभ्यासकांचे महत्त्वपूर्ण लेख आदिंचा वापर केला जाईल. याशिवाय इंटरनेट, संगणक, फेसबुक, ट्युटर, व्हॉट-स्प आणि विश्वकोश यामध्ये आलेली मराठी भाषेसंदर्भातील माहिती यांचाही आधार संशोधनासाठी केला जाईल.

संशोधनाची व्याप्ती :-

मराठी भाषेच्या उगमापासून ते २१ व्या शतकापर्यंतच्या मराठी भाषेची मीमांसा किंवा अभ्यासक्षेत्र संशोधनासाठी निवडले जाईल. याशिवाय मराठी ही केवळ महाराष्ट्राचीच भाषा नव्हे तर संपूर्ण जगातील मराठी भाषिकांची आहे. म्हणजेच सव्वाअकरा कोटी लोकांची मराठी ही जगातील १० व्या क्रमांकाची भाषा आहे. संपन्न ज्ञानभाषा असणारी मराठी महानुभावांची धर्मभाषाही आहे. मराठी ही राजभाषा असणारे सातवाहन, राष्ट्रकुट आणि मराठे हे राज्यकर्ते भारतभर राज्य करत होते. ही भाषा बोलणारे लोक आज जगातील ७२ देशात पसरलेले आहेत, ती फक्त एका प्रांताची भाषा नसून ती महत्त्वाची राष्ट्रीय भाषा आहे. थोडक्यात, आज २१ व्या शतकात मराठी भाषेसंदर्भात अखिल भारतीय विश्व साहित्य संमेलने भरवली जात आहेत; त्यामुळेच प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती वाढली आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

संशोधन करणे ही आधुनिक काळाची गरज आहे. कारण संशोधनामुळे विषयाची सखोल माहिती आपणास मिळते. म्हणूनच "२१ व्या शतकातील मराठी भाषेचा चिकित्सक अभ्यास" या विषयावर संशोधन करत असताना मराठी भाषेचा उगम, मराठी भाषेची वाटचाल, मराठी भाषेबद्दल मराठी माणसांची असलेली अस्मिता, इतर भाषेबरोबर मराठी भाषेचे असलेले महत्त्व, मराठी भाषेला शासनाने द्यावयाचा अभिजात भाषेचा दर्जा किंवा २१ व्या शतकात मराठी भाषेसंदर्भात प्राथमिक शाळांपासून ते विद्यापीठ पातळीपर्यंत मराठीचे असलेले महत्त्व, मराठी भाषेतील साहित्य आणि ज्ञानभांडाराचा समाजाला निश्चितच उपयोग होईल, एवढे महत्त्व आपल्या मराठी भाषेचे आहे असे संशोधकास वाटते.

"२१ व्या शतकातील मराठी भाषेचा चिकित्सक अभ्यास"

संशोधनासाठी प्रकरणनिहाय विभागणी

प्रकरण पहिले

मराठी भाषा : उगम आणि विकास

प्रकरण दुसरे

मराठी भाषेवरील इतर भाषांचे परिणाम

प्रकरण तिसरे

मराठी भाषेसमोरील आव्हाने आणि उपाययोजना

प्रकरण चौथे

२१ व्या शतकातील मराठी भाषेची उपयुक्तता

प्रकरण पाचवे

२१ व्या शतकातील मराठी भाषेची सद्यःस्थिती

प्रकरण सहावे

निष्कर्ष आणि उपसंहार

परिशिष्ट्ये :-

अ) संदर्भग्रंथ सूची

ब) नियतकालिक

क) वर्तमानपत्रे

ड) संकेतस्थळ

"२१ व्या शतकातील मराठी भाषेचा चिकित्सक अभ्यास"

प्रकरण पहिले

मराठी भाषा : उगम आणि विकास

१.१ मराठीची पूर्वपीठीका

१.२ कोरीव लेखाचे पुरावे (शिलालेख, ताम्रपट)

१.३ प्राचीन ग्रंथभांडार

१.४ मराठी भाषेचा उगम आणि विकासा संदर्भातील विविध कालखंड

१.५ मराठी भाषा : व्याख्या व स्वरुप

१.६ २१ व्या शतकातील मराठी भाषेचे स्वरूप

प्रकरण दुसरे

मराठी भाषेवरील इतर भाषांचे परिणाम

२.१ संस्कृत भाषेचा परिणाम

२.२ द्रविडी भाषेचा परिणाम

२.३ कन्नड भाषेचा परिणाम

२.४ तेलगू भाषेचा परिणाम

२.५ तामीळ भाषेचा परिणाम

२.६ अरबी - फार्सीचा परिणाम

२.७ पोर्तुगीज, फ्रेंच भाषेचा परिणाम

२.८ मराठीवर इंग्रजी भाषेचा परिणाम

२.९ मराठीवरील आधुनिक आर्य भारतीय भाषांचा परिणाम

२.१० २१ व्या शतकातील इतर भाषांच्या परिणांमुळे मराठी भाषेचे बदललेले आधुनिक स्वरुप

प्रकरण तिसरे

मराठी भाषेसमोरील आव्हाने आणि उपाययोजना

३.१ परकीय भाषांचे आक्रमण

३.२ मराठी भाषेविषयी मराठी माणसांची अनास्था

३.३ शालेय, महाविद्यालयीन स्तरावरील अनास्था

३.४ वाचन संस्कृतीची उदासीनता

३.५ राजकीय नेतृत्त्वाची उदासीनता

३.६ जागतिकीकरणाचा परिणाम

३.७ चंगळवादी साहित्याची निर्मिती

३.८ मराठी मुलखात मराठी बोलायला ओंघळवाणे वाटणे

३.९ पाश्चात्य संस्कृतीचे आकर्षण

३.१०. मराठी माणसांचे गैरसमज आणि मनोभूमिका

३.११ शासनाची मराठी भाषेविषयीची भूमिका (उपाययोजना)

३.१२ मराठी भाषेच्या अध्ययन व अध्यापनात सुधारणा

३.१३ ग्रंथनिर्मिती, कोशनिर्मिती, ग्रंथपुरस्कार व प्रसार

प्रकरण चौथे

२१ व्या शतकातील मराठी भाषेची उपयुक्तता

४.१ प्राथमिक ते विद्यापीठ पातळीपर्यंतच्या अध्यापनात असलेले महत्त्व

४.२ सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रातील मराठीची उपयुक्तता

४.३ संगणक क्षेत्रात मराठीची गरज

४.४ माणसांच्या दैनंदिन व्यवहारासाठी मराठी भाषेची आवश्यकता

४.५ जागतिकीकरण, प्रसारमाध्यमांमध्ये असलेले मराठी भाषेचे महत्त्व

४.६ प्रशासक व्यवहार, न्यायालयीन कामकाज आणि मराठी भाषा

४.७ कायदा आणि मराठी भाषा

४.८ मराठी भाषा : शिक्षण आणि ज्ञानभाषा

प्रकरण पाचवे

२१ व्या शतकातील मराठी भाषेची सद्यःस्थिती

५.१ मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा

५.२ मराठी साहित्य संमेलनाची भूमिका

५.३ संगणकासाठी मराठी भाषा

५.४ मराठी भाषेला ज्ञानभाषेचा दर्जा

५.५ मराठीचे विविध स्तरावर अध्ययन, अध्यापन

५.६ मराठी भाषेत संशोधनाला चालना

५.७ जागतिकीकरण आणि मराठीचा गुणगौरव

५.८ साहित्यिक वाचकांची मराठीविषयीची अभिरुची

५.९ परप्रांतियांना मराठीविषयी आकर्षण

५.१० मराठी विषय सक्तीचा करावा

५.११ मराठी भाषेचा गुणगौरव व जागर

५.१२ मराठी भाषेतील साहित्यसंपदा

५.१३ मराठी साहित्य लेखकांची परंपरा

५.१४ मराठी भाषेतील शब्दसंग्रह

५.१५ विविध शब्दकोश निर्मिती

५.१६ मराठी भाषेतील म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते

५.१७ मराठी भाषा : प्रतिमा, प्रतीक, अलंकार, यमक इत्यादीचा वापर

प्रकरण सहावे

निष्कर्ष आणि उपसंहार

"२१ व्या शतकातील मराठी भाषेचा चिकित्सक अभ्यास" या प्रस्तुत विषयाच्या शोधप्रबंधामध्ये प्रत्येक प्रकरणामध्ये केलेले संशोधन आणि संशोधनांती काढलेले निष्कर्ष यांची तपशीलवारपणे मांडणी या प्रकरणात केली जाणार आहे. मराठी भाषेचा उगम आणि विकास, २१ व्या शतकातील मराठी भाषेवरील इतर भाषांचे परिणाम, मराठी भाषेसमोरील आव्हाने आणि उपाययोजना, मराठी भाषेची उपयुक्तता, मराठी भाषेची सद्य:स्थिती अशा पहिल्या प्रकरणापासून ते शेवटच्या प्रकरणापर्यंतचा ओझरता आढावा वाचन, मनन, चिंतन करुन अभ्यासपूर्ण संशोधन प्रस्तुत प्रकरणात केले जाईल.

परिशिष्टे :-

संदर्भग्रंथ सूची :-

१.	आवलगावकर अविनाश, शहा मृणालिनी	:	मराठीचे भवितव्य
२.	दावतर वसंत	:	मराठीचे शिक्षण
३.	डॉ. मालसे स.ग., डॉ. पुंडे द.दी., डॉ. सोमण अंजली	:	भाषाविज्ञान परिचय
४.	डॉ. कानडे मु.श्री.	:	मराठी भाषिक अभ्यास ऐतिहासिक, वर्णनात्मक
५.	डॉ. जाधव जयद्रथ	:	जागतिकीकरण - मराठी आव्हाने आणि उपाय
६.	डॉ. गोसावी र. रा.	:	मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र
७.	डॉ. इनामदार हे. वि., डॉ. मालसे	:	भाषाविज्ञान वर्णनात्मक, ऐतिहासिक
८.	डॉ. तेगमपूरे मारोती (सहसंपादक)	:	भाषाविकास आणि राजकारण
९.	डॉ. गोरे दादा	:	आधुनिक भाषाविज्ञान आणि मराठी भाषा
१०.	डॉ. घोंगडे रमेश	:	भाषा आणि भाषाविज्ञान
११.	डॉ. बिराजदार वसंत	:	भाषाविज्ञान
१२.	डॉ. कोत्तापल्ले नागनाथ	:	साहित्याचा अवकाश
१३.	डॉ. कोत्तापल्ले नागनाथ	:	साहित्याचा अन्वयार्थ
१४.	कालेलकर ना. गो.	:	भाषा, इतिहास, भूगोल
१५.	कालेलकर ना. गो.	:	भाषा आणि संस्कृती
१६.	कुलकर्णी कृ. पा. : मराठी भाषा	:	उद्‌गम आणि विकास
१७.	तुळपुळे श. गो.	:	यादवकालीन मराठी भाषा
१८	खैरे विश्वनाथ	:	मराठी भाषेचे मूळ संपादक आवलगावकर)
१९.	पवार गो. मा.	:	मराठीचे भवितव्य
२०.	घोंगडे रमेश, घोंगडे अश्विनी	:	मराठी भाषा आणि शैली
२१.	शिंदे विठ्ठल रामजी	:	मराठीचे भवितव्य
२२.	चित्रे दिलीप पुरुषोत्तम	:	मराठीचे भवितव्य
२३.	केतकर कुमार	:	मराठीचे भवितव्य

२४.	राजवाडे वि. का.	:	अक्षरयात्रा मराठी चिंता आणि चिंतन
२५.	नियतकालिके / त्रैमासिके	:	१) अक्षरगाथा, (कादंबरी विशेषांक) - संपा. डॉ. जाधव मा. मा. २) अक्षरवैदर्भी, संपा. - डॉ. सावरकर सुभाष ३) प्रतिष्ठाण - नांदेडकर श्रीधर ४) जागर स्मरणिका - डॉ. जाधव, मा.मा. (३५ वे मराठवाडा साहित्य संमेलन, वसमत) ५) लोकराज्य - फेब्रुवारी २०१३ ६) शोधसंपदा - डॉ. सोलापुरे राजशेखर
२६.	वृत्तपत्रे	:	दै. महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, एकमत, सकाळ, पूण्यनगरी, दिव्य मराठी, लोकसत्ता, सामना इ.
२७.	संकेतस्थळे	:	www.marathivishwakosh.com www.navprabha.com www.gogleonlinedictionary.com

(टीप : सदरील संशोधन आराखड्यात संशोधनाला गती येईल त्याप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी बदल होणे संभवनीय आहे.)

संशोधक

प्रा. राजकुमार शंकर पवार

एम.ए.,बी.एड. (मराठी)

श्री. कुमारस्वामी महाविद्यालय, औसा, जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सौ. जयदेवी पवार

एम.ए., बी.एड., एम.फिल., पीएच.डी.

मराठी विभाग

कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव, जि. लातूर